# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.०४/०३/२०१९

## दि.०३/०३/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे २०८/१९,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट १८४,१३२(१)(क), ११९/१७७ |
| **फिर्यादी** | सोमनाथ बनसोडे, पो.ना. हडपसर पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | आयशर बसवरील अज्ञात चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/०३/२०१९ रोजी १९/४५ वा. मंतरवाडी चौक ते हांडेवाडी सार्वजनिक रस्त्यावर,रूद्र सर्व्हिस सेटंर समोर, किर्लोस्कर कंपनी जवळ,मंतरवाडी,फुरसुंगी,ता.हवेली,जि.पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील कार ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी मोपेडस्वार सुहास रामराव चव्हाण,वय-४९ वर्ष,रा.बिल्डींग क्र.६७,टिळकनगर,चेंबुर(पश्चिम),कुर्ला,मुंबई यांस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता, अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. के.एस.लोंढे ८९७५०२०५०० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रामबाग पो स्टे १०२/१९,भादविक ४३५ |
| **फिर्यादी** | मंघा कर्वे,वय-३५,रा.नेने घाट,पुणे |
| **आरोपी** | एक इसम,रा.११६,शनिवार पेठ,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/०३/२०१९ रोजी ००/०० वा. ११८,शनिवार पेठ,नेने घाट,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी त्यांची दुचाकी मोपेड ही नमुद ठिकाणी पार्क केली असताना, यातील नमुद इसमाने कोणतेतरी ज्वलनशिल द्रव्य टाकुन,त्यांची मोपेड पेटवुन देऊन गाडीचे व गाडीचे डिक्कीत असलेले रोख ६,५००/- रूपये रक्कमेसह,मोपेड डिक्की मधील इतर सामानाचे असा एकुण ६३,०००/- रुपयाचे नुकसान केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. संगमेनाथ परगेवार ९०२८८४६६९१ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लष्कर पो स्टे १४५/१९,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | युवराज घावटे-पाटील,वय-३० वर्षे,रा.शंकरशेठ रोड,भवानी पेठ,पुणे |
| **आरोपी** | अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/०३/२०१९ रोजी १३/१० वा. ते १३/२० वा.चे दरम्यान एम.जी.रोड,जस्ट इन टाईम या घडयाळाच्या दुकाना समोर सार्वजनिक रोडवर पार्क केलेल्या कार मधुन |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे जस्ट इंन टाईम या एम.जी. रोडवरील घडयाळाच्या दुकानात घडयाळ खरेदी करण्यासाठी गेल्यानंतर,फिर्यादी यांचे वडील हे कार मध्ये बसलेले असतांना,एक अनोळखी इसमाने जाणुन-बुजुन फिर्यादी यांचे वडीलांना कारमधुन ऑईल गळत असल्याचे खोटे सांगितल्याने,वडील हे फिर्यादी यांना सांगण्यासाठी दुकानात आले असतांना,सदर इसमाने फिर्यादी यांचे कारचे मागील दरवाजा उघडुन,मागील सिटवर ठेवलेली बॅग त्यामधील ३५,०००/- रोख रक्कम,दोन मोबाईल,घडयाळ व इतर कागदपत्रे असा एकुण १,७२,५००/-रू किचा ऐवज चोरी करून घेऊन गेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. पी.जी.गज्जेवार ८१४९५९१६४६ |

## दि.०४/०३/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोरेगांव पार्क पो स्टे ११६/१९,भादविक ३५३,३२३,५०४ |
| **फिर्यादी** | लक्ष्मण बांगर, पोलीस नाईक, बंडगार्डन वाहतूक विभाग,पुणे शहर |
| **आरोपी** | एक इसम,वय-५१ वर्ष,रा.घोरपडी,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/०३/२०१९ रोजी २२/५० वा. सर्किट हाऊस चौक,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे वरिष्ठ अधिकारी व सहकारी यांचे सोबत सर्किट हाऊस चौक येथे नेमुन दिलेले शासकीय नाकाबंदी करून त्यांचे कर्तव्य बजावित असताना,फिर्यादी यांनी यातील नमुद इसमाने दारू अगर त्यासारखे मादक पदार्थाचे सेवन करून,फिर्यादी व इतर कर्मचारी यांना वाईट-वाईट अपशब्द वापरून,फिर्यादी यांचे अंगाशी धका-बुक्की करून ते करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा आणला आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. के.एस शिंदे ९६६५९९९९८२ |

**"पत्रकार परिषदे बाबत"..** **दि.०४/०३/२०१९**

**सर्व प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी बंधु व भगिनी यांना कळविण्यात येते की, मा.पोलीस उप-आयुक्त,वाहतुक शाखा, श्री.पंकज देशमुख सर हे आज दि.०४/०३/२०१९ (सोमवार) रोजी १६/०० वा.पोलीस उप-आयुक्त कार्यालय,वाहतुक शाखा,पुणे शहर याठिकाणी वाहतुक समस्या व त्यावरील उपययोजना याबाबत पत्रकार परिषद घेणार आहेत.**

**तरी आपले फोटोग्राफरसह आपली उपस्थिती प्राथनीय आहे.**

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुकत कार्यालय,पुणे**

**प्रेसनोट** दिनांक २५/०२/२०१९

**छायाचित्र स्पर्धा** "पोलीस इन ॲक्शन नागरीकांची सेवा आणि सुरक्षितेसाठी कार्यरत पोलीस" या विषयावर विनामुल्य छायाचित्र स्पर्धेबाबत.

पुणे पोलीस आयुक्त, पुणे शहर यांच्या संकल्पनेतून १. प्रेस/ प्रोफेशनल छायाचित्रकार, २. हौशी छायाचित्रकार ३. पोलीस खात्यातील अधिकारी/कर्मचारी त्यांचे कुटूंबिय या गटांकरीता "पोलीस इन ॲक्शन - नागरीकांची सेवा आणि सुरक्षिततेसाठी कार्यरत पोलीस" या विषयावर **विनामुल्य छायाचित्र** स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर स्पर्धेकरीता हौशी छायाचित्रकार या गटांमध्ये कोणीही नागरिक सहभागी होवु शकतो.

सदर स्पर्धेकरीता प्रथम क्रमांक - रोख ५००० रू व शिल्ड, द्वितीय क्रमांक, - रोख ३००० रू व शिल्ड, तृतीय क्रमांक - रोख २००० रू व शिल्ड व उत्तेजनार्थ २ बक्षीसे देण्यात येणार आहेत.

प्रवेशिका http//www.pixlent.com/punepolicephotocontet या संकेतस्थळावर उपलब्ध असून फोटो (इमेज) वरील दिलेल्या संकेत स्थळावर **ऑनलाईन** पाठवावेत.

**स्पर्धेसाठीचे नियम व अटी-**

१. प्रत्येक स्पर्धकाने जास्तीत जास्त ५ इमेज JPG फॉरमॅटमध्ये ३०० DPI 5 MB साईजचे ओरीजनल व स्वत काढलेल्या इमेज असाव्यात. इमेजवर कोणत्याही प्रकारचे वॉटरमार्क, लोगो, चिन्ह नसावे
२. दिनांक २५/०२/२०१९ रोजीची ही मुदत दि.१२/०३/२०१९ पर्यंत वाढविली असुन दि.१२/०३/२०१९ पर्यंत प्रवेशिका व फोटो नमुद संकेतस्थळावर स्विकारण्यात येतील
३. निवड झालेले फोटोग्राफ्स हे आयोजक आपल्या प्रदर्शनासाठी व माहिती पुस्तीकेसाठी वापरु शकतील.
४. इमेज पाठविण्यासाठी http//www.pixlent.com/punepolicephotocontet या संकेतस्थळाचा वापर करावा. सदरचे संकेतस्थळ **रजिस्ट्रेशन केल्यानंतरच** या स्पर्धेत भाग घेता येईल.
५. प्रत्येक स्पर्धकाने त्याचा ईमेल आयडी व मोबाईल नंबर देणे आवश्यक आहे.
६. मोबाईल किंवा स्मार्ट फोन ने काढलेली छायाचित्रे सुध्दा स्पर्धेत पाठविता येतील.
७. फोटोग्राफ निवडीसाठी परीक्षक समितीचा निर्णय अंतिम राहील.

**छायाचित्र स्पर्धेसाठी पुणे शहरातील १. प्रेस/प्रोफेशनल छायाचित्रकार, २. हौशी छायाचित्रकार, ३. पोलीस अधिकारी / कर्मचारी तसेच त्यांचे कुटूंबिय असे गट आहेत. हौशी छायाचित्रकार गटात सर्व कॉलेजचे प्रिन्सीपल,व्याख्याते, कॉलेज विद्यार्थी, शिक्षकवृंद, सर्व पत्रकार, उत्सुक व इच्छुक नागरीक यांनी जास्तीत जास्त सहभाग घ्यावा. असे पुणे पोलीसांकडून आवाहन करण्यात येत आहे.**

**अधिक माहितीसाठी- संपर्क अधिकारी-**

१. श्री. अजित लकडे, पोलीस निरीक्षक, विशेष शाखा, पुणे शहर.- ८३२९८०४८३६



# Police in Action

for **SERVICE** & **SECURITY** of People

**PHOTO CONTEST!**

Extended ... to 12 March 2019

TO TAKE PART & KNOW MORE, GO TO

WWW.PIXLENT.COM/PUNEPOLICEPHOTOCONTEST

महाराष्ट्र पोलीस
Pune Police

# Police in Action

## for Service & Security of People

महाराष्ट्र पोलीस
Pune Police



### Photography Contest!

Open to All!

Participate, in one of three groups:

1. **Amateur/ Hobby Photographers**
2. **Police officers, staff & members of their families**
3. **Press/ Professional Photographers**

Prizes in each Group!

1st: **Rs. 5,000**
2nd: **Rs. 3,000**
3rd: **Rs. 2,000**
Two more consolation prizes

**Entry Free!**

Last Date Extended ...
**12 March 2019**

To take part & know more, go to
**www.pixlent.com/punepolicephotocontest**

जनसंपर्क अधिकारी,
पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर